श्रमसाधना SSAMT

श्रम साधना,अमरावती

# कृषी विज्ञान केंद्र

## दुर्गापूर (बडनेरा),जि.अमरावती.

# मेघदुत


*(हवामान आधारीत शेती व्यवस्थापनासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी एक मोबाईल ॲप)*

*(भारतीय हवामान शास्त्र विभाग व भारतीय कृषी संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने विकसीत मोबाईल ॲप्लीकेशन)*


उद्देश :- हवामान बदल व निसर्गाच्या लहरीपणामुळे दिवसेंदिवस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने कृषी उत्पादनात घट होत आहे. हवामान अंदाजाची माहिती शेतकऱ्यापर्यंत वेळेत न पोहोचल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान होत आहे. हवामान अंदाज व हवामान अंदाजावर आधारीत कृषी सल्ला शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचवण्याच्या उददेशाने भारतीय हवामान शास्त्र विभाग व भारतीय कृषी संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने मेघदुत मोबाईल ॲप विकसीत करण्यात आलेले आहे.





सर्व प्रथम ॲप चालु केल्यावर अशी स्क्रिन आपल्याला पहावयास मिळेल.




मोबाईल नं.पसंतीची भाषा,भरुन झाल्यावर साईन अप करावे.






नाव नोंदणी कशी करावी? नाव. मोबाईल नं. पसंतीची भाषा,लिंग, राज्य व जिल्हा याविषयी माहिती भरुन नाव नोंदणी करावी.






नाव नोंदणी नंतर आपणास अशी स्क्रिन पाहवयास मिळेल.

## * ॲप मधुन आपल्याला कोणकोणती माहिती मिळेल ? *




*मेघदुत ॲपद्वारे शेतकऱ्यांना पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज मिळेल तसेच शेतकरी मागील दहा दिवसातील हवामानाचा आढावा घेऊ शकतील.हवामान अंदाजावर आधारीत अचुक कृषी सल्ला मिळाल्याने पिकांचे योग्य नियोजन करणे सोयीचे होईल. शेतीतील दैनंदिन कामात निर्णय घेण्यास हवामान अंदाजावर आधारीत कृषी सल्ला महत्त्वाचा ठरणारा असुन शेतकऱ्यांच्या निर्णय क्षमतेत गतीमानता येऊन खराब हवामानामुळे होणारे शेतीचे नुकसान टाळण्यास ही मदत होणार आहे.*

**संपादक व प्रकाशक**

**डॉ. के.ए.धापके**

**वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख**

**कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा), जि. अमरावती.**

Email : pckvkda2015@gmail.com www.kvkdurgapur.in

- लेखन व संकलन-
डॉ. एस. जी. मुंढे
विषय विशेषज्ञ (कृषी हवामान )
मो. नं. 7620877237

- लेखन व संकलन-
कु. व्हि.बि. पोहरे
कृषी हवामान निरिक्षक

**जिल्हा कृषी हवामान केंद्र (DAMU)**

**"आजादी का अमृत महोत्सव" "Azadi ka #Amrit Mahotsav"**